5-17
Research Journal

Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

18th Feb. 2019 Special Issue- 130 (II)

# THE ROLE OF GOVERNMENT TO PROTECT THE HUMAN RIGHTS

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

**Executive Editor of This Issue**
Dr. Vanmala Govindrao Gundre
Principal
Yashwantrao Chavan College, Ambajogai. Dist. Beed.

**Co-Editor**
Dr. Ahilya Barure
Dr. D.R. Tandale
Dr. D.B. Tanduljekar

RESEARCH JOURNEY

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 130 (II) | Feb. 2019 | UGC Approved No. 40705
The Role of Government to protect the Human Rights

# मानवाधिकार आणि भारतीय स्त्री - एक समाजशास्त्रीय अध्ययन

**प्रा.डॉ.तंगलवाड दत्ता माधवराव**
सहाय्यक प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर गढी, ता.गेवराई, जि.बीड.

---

**प्रस्तावना :-**

ॲरिस्टॉटल म्हटले आहे की, मानव समाजशील प्राणी, त्याला एकमेकांच्या सहकार्याने जीवन जगावे लागते.परस्परसहाकार्याशिवाय समाजाची प्रगती नाही. पण भारतीय समाजातील वर्ण व्यवस्था, जाती व्यवस्था यामुळे निर्माण झालेलाश्रेष्ठ कनिष्ठत्वाच्या भावनेमुळे आज माणुस माणसाचा वैरी बनला आहे.समाजातील बलवान माणसे दुर्बला लोकांना गिळृंकत करत आहेत.तळागाळातील माणसांना म्हणजेचस्त्री, दीन-दलित, भटके, आदिवासीयांना धर्मग्रंथांच्या नावाखाली सवर्णांनी प्राचीन काळापासुन जीवन जगणे अशक्य केले आहे.त्यांना वेळोवेळी प्रतिकुल परिस्थितीलातोंड द्यावं लागते.हाल अपेष्टाचे जीवन जगावे लागलेही व्यवस्था संपूर्ण जगभर कोणत्या ना कोणत्या स्वरुपात अस्तित्वात असलेली दिसून येतं म्हणून दबलेल्या, पिचलेल्य, छळल्या गेलेल्या लोकांना माणुस म्हणुन जगता यावे या संदर्भात जागतिक पातळीवर विचार विनीमय होवुन मानवाधिकारसंकल्पनेचा जन्म झाला आणि संपूर्ण जगभर धर्मसुधारणांची चळवळ निर्माण होवुन सामाजिक परिवर्तनाला चालना मिळाली. त्यातनूच फ्रेंच राज्यक्रांती, रशियन राज्यक्रांती, अमेरिकन राज्यक्रांती घडुन आली व न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता या मुल्याचा उदय होवुन 'जगा आणि जगु द्या'ही देणगी जागाला प्रदान होवुन मानवाधिकाराचीसंकल्पना उदयाला आली म्हणुन प्रस्तुत लघुशोध निबंधात मानवाधिकारहीसंकल्पना स्पष्ट करुन मानवाधिकारामुळेस्त्रीयांचे जीवन कसे प्रभावीत झालेहे शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**संशोधन विधान :- 'मानवाधिकार आणि भारतीय स्त्री एकसमाजशास्त्रीय अध्ययन'** या विषयाच्या अनुषंगाने मानवाधिकाराचेस्त्री विकासातील योगदानाचासमाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अध्ययन करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधन पद्धती :-** कोणत्याही घटनेच्या व घटकाचा समाजावर काय परिणाम झाला हे अभ्यासण्यासाठी एक विशिष्ट शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करावा लागतो म्हणुन प्रस्तुतसंशोधनात विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला.

**संशोधन क्षेत्र मर्यादा :-**मानवाधिकाराने सर्व मानवी जीवन प्रभावीत केलेले आहे पण मानवाधिकाराचासर्वकष परामर्श एका लघुशोध निबंधात घेणे केवळ अशक्यप्राय आहे म्हणुन प्रस्तुतसंशोधनात मानवाधीकाराचे स्त्री जीवनाच्या विकासातील योगदानाचा आढावा घेण्यात आला म्हणजेच मानवाधीकार आणि स्त्री जीवन ही या संशोधनाची मर्यादा आहे.

**नमुना निवड :-**प्रस्तुत अध्ययनासाठीसहेतुक नमुना निवड तंत्राच्या आधारेस्त्रियांचीसंशोधनासाठी निवड करुन स्त्री जीवनावर काय परिणाम झालेहे शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**माहितीसंकलनाचेसाधने :-**प्रस्तुतसंशोधनात तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनाचा आधार घेण्यात आला. त्यात संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, नियतकालिके, इंटरनेटचाआढावा घेण्यात आला.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

1) मानवाधिकाराचे स्वरुप समजावुन घेणे.
2) स्त्रीयांच्या जडणघडणीतील मानवाधिकाराच्या योगदानाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके :-**

1) मानवाधिकारामुळे मानवी मूल्याची जोपासना झाली.
2) मानवाधिकारामुळेस्त्रीयांना त्यांच्या हक्काची जाणीव होवून ते प्राप्त होण्यासाठी त्यांच्या प्रयत्नाला चालन मिळाली.

**माहितीचे विश्लेषण :-**'जगण्याचा अधिकारहा मानवाला निसर्गाने दिलेला मुलभूत अधिकार आहे'[1] आणि तो त्यांचा जन्म सिद्ध अधिकार आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुत हेत्याचे मुळ आधार आहेत म्हणुन जॉन लॉक यांनी जीवन, स्वातंत्र्य व संपत्तीचा अधिकारहा मुलभूत अधिकार मानले.तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मुलभूत हक्काला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. लोकांना प्रतिष्ठेचे जीवन प्रदान केल्याशिवाय कोणत्याही देशातील लोकशाहीला अर्थ नाही म्हणुन भारतीय संविधानाच्या तिसऱ्या भागात मानवाच्या मुलभूत हक्कांचा समावेश केला प्रत्येक माणसाला सन्मानाने जीवन जगता यावे म्हणुनसंयुक्त राष्ट्रसंघाने 10 डिसेंबर 1948 रोजी 48 विरुद्ध 00 मतदानाने जाहिरनामा स्विकारला. त्यामध्ये असलेले 30 कलम सर्व राष्ट्रांनी स्विकारावं अशी शिफारस केलीहोती.हा जाहीरनामा समाजपरिवर्तनाचे व लोकशाहीचे प्रभावी साधन ठरले म्हणुन 10 डिसेंबर हा दिवस वैश्विक मानवअधिकार दिवस म्हणूनसाजरा केला जातो."मानवी हक्कअधिकारतयार केलेल्या आंतरराष्ट्रीय कायद्यांमध्ये 80 पेक्षा जास्त करारांचा समावेश आहे.तसेच इतर अनेक शिफारशी अंतरराष्ट्रीयसंघटनांनी केल्या पण त्यांची अंमलबजावणी बंधनकारक नाही पण त्या शिफाराशी कायदासदृश्य आहेत.त्यांचा उपयोजनाच्या आखणीसाठी उपयोगहोतो."[2] असेअसूनही जगात वेगवेगळ्या भागात मानवाधिकारावर आक्रमणेहोताना दिसुन येतात म्हणून"शिक्षणाद्वारे मानवी अधिकाराचे सार्वत्रीकरण झाले पाहिजे यासाठी युनेस्कोने 1974 मध्ये मापदंडात्मक साधनाचा स्विकार केला. तसेच ऑस्ट्रियात व्हिएन्न -1979, माल्टा येथे 1987 व कॅनडामध्ये 1993 मध्ये आंतरराष्ट्रीय परिषदा घेवुन मानव अधिकाराचे शिक्षण देणेहाच एक मानव अधिकार आहेहे घोषीत केले."[3]याची फलनिष्पत्तीम्हणून आफ्रिकेतील वर्णभेदी व्यवस्था संपुष्टात येवुन लोकशाहीही जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणुन ओळखली जात असलीतरी येथे पदोपदी दीन-दलीत, स्त्रीयाचे मानवी हक्क पायदळी तुडवले जातात म्हणुन भारत देखील मानवाधिकार कायदा 28 सप्टेंबर 1993 रोजी झाला व 12 ऑक्टोबर 1947 रोजीमानव अधिकार आयोगाची स्थापना करण्यात आली म्हणुन प्रस्तुत शोध निबंधात स्त्रीयांस दिलेले मानवी हक्क व वास्तव यांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**मानव अधिकाराची व्याख्या :**मॅक फरलेन -' मानव अधिकारहे असे नैतिक अधिकार आहेत जे प्रत्येकस्त्री-पुरुषाला माणुस या नात्याने प्राप्त झाले आहेत.'

भारतीय मानवाधिकार आयोगाप्रमाणे - "मानव अधिकार म्हणजे व्यक्ती स्वातंत्र्य जीवन आणि समतेशी निगडीत असे मुलभूत अधिकार जे व्यक्तीला सन्मानाने जगण्यासाठी अत्यावश्यक आहे."

**प्रा.एच.के. लास्की-**"हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी परिस्थितीहोय की ज्याशिवाय व्यक्तीला सामान्यतः स्वतःच्या सर्वांगीणक विकास करुन घेणे शक्य होत नाही."

वरील व्याख्येवरुन हेस्पष्टहोते की, हक्क आणि प्रतिष्ठेबाबत सर्व मानव सारखेच आहेत व आपले नैतिक कर्तव्य म्हणुनत्याचे सर्वांनी पालन केले पाहिजे.प्रत्येकांनी एकमेकांचा सन्मान केला पाहिजे.हे जागतिक पातळीवर सर्वांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न शासकीय पातळीवर करण्यात येत आहे.यातून सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतीक क्षेत्रातील गुलामगिरी नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला. व्यक्तीचे संरक्षण, न्याय , मालमत्ता, विवाह, अभिव्यक्ती, शांततामय मार्गाने सभा घेणे, शासनात सहभागी होणे, शिक्षण, समाधानकारक जीवन जगणे, सांस्कृतीक कार्यात मुक्तपणे सहभागी होण्याचा हक्क, मानवी अधिकार, राज्य घटनेने दिले असलेतरी आजहीसमाजाने अनेक जातीसमुह वस्त्रीयांना अनेक अधिकारापासुन वंचीत ठेवलेले आहे. तरीहीस्त्री जीवन झालेल्या परिवर्तनात मानवं अधिकाराची मोलाची भूमिका आहे.ती आपणांस पुढीलप्रमाणे सांगता येते.

1. **सतीप्रथेचेसमुळ उच्चाटनः-** मनुस्मृतीवर आधारलेल्या समाजव्यवस्थेने पती मृत्यु पावल्यास त्याच्या चीतेवर जिवंत जाळण्याची व्यवस्था केलीहोती पण हे मानवाधिकाराच्या कोणत्याच चौकटीत बसणारी प्रथा नव्हती म्हणुनही प्रथा नष्ट करण्यासाठी राजाराम मोहन रॉय यांच्या प्रयत्नातुन 1839 साली जरी कायदा झाला असला तरीती प्रथा नष्ट झाली नव्हती पण घटनेने केलेल्या तरतुदीमुळेसती जाण्यास भाग पाडणे कायदेशीर गुन्हा ठरवण्यात आल्यामुळे या प्रथेचे उंच्चाटनहोण्यास मदत झाली आणि माणसाने माणसाला नाकारलेला अधिकार मिळाला.
2. **केशवपण प्रथेचे निर्मूलन :-**सतीप्रथेनंतर उदयाला आलेली प्रथा म्हणुन केशवपण प्रथेकडे पाहिले जाते. पुरुषांनी आपल्या वर्चस्ववादी विचार सरणीतुन स्त्रियांना कायम कनिष्ठ लेखले पती निधनानंतरस्त्री करुप दिसली पाहिजे म्हणुन केशवपणाची प्रथा उदयाला आली.ही प्रथा मानवी हक्कावरील गंडातर असल्यामुळे प्रयत्नर्पुक वैधानिक रुपात तरतुद करुन ही प्रथा भारतातून नष्ट करण्यात आली.
3. **हिंदु विवाह कायदा 1955 अन्वये घटस्फोटाला मान्यता :-**एखाद्या चुकीच्या व्यक्ती सोबत विवाह झाल्यास अनेक यातनांना सामोरे जात मरेपर्यंत त्याच पुरुषासोबत रहाणेसमाजाने स्त्रीवर सक्तीने केलेहोते. पण 1955 च्या हिंदु विवाह कायद्यातील तेराव्या कलमाप्रमाणे ठरावीक अटीच्या आधारे घटस्फोटाना परवानागी दिली.उदा. पती व्यभिचारी आहे, धर्मांतर, गुप्तरोग असणे आणि सात पेक्षा अधिक वर्षांपासुन बेपत्ता असणे, सन्यास घेणे इत्यादी अवस्थेत घटस्फोट घेण्याची मान्यत राज्य घटनेने दिली असुनते मानवी अधिकाराची फलश्रृती आहे.
4. **हुंडाबंदी :-**भारतीय घटनेतील कलम 304 अन्वये हुंडा देणे, घेणे कायद्याने गुन्हा असुनस्त्री मरण पावल्यास वडीलांच्या तक्रारीवरुन कायदेशीर कार्यवाही केली जाते व गुन्हेगाराला शिक्षा व दंड ठोठावला जातो. यासाठी भारतसरकारने 1961 मध्येहुंडाप्रतिबंधात्मक कायदासहमत केला.हा कायदा म्हणजेस्त्रीयांच्या मानवी हक्काचे स्वरक्षणाचे कवच जरी असलेतरी कायदा निरुपयोगी ठरलाआहे.याच कायदयातीलकलम 3 अन्वये गुन्हेगारास 5 वर्षे तुरुंगवास, 15 हजारापर्यंत शिक्षा आहे पण ती कागदावरच राहिली.
5. बालविवाह प्रतिबंधक कायदा - 1929 व 2016
6. स्त्रीच्या संमती शिवाय गर्भपात कायदा - कलम भा.दं.वि. 313
7. गर्भपात कायदा 1971 व सुधारणासह कायदा 2006
8. स्त्रीच्या संमतीशिवाय गर्भपात कायदा कलम भा.द.वि. 313
9. मुलीचा अपहार कायदा भा.द.वि. 363
10. अल्पवयीन मुलीला वेश्या व्यवसायासाठी विकणे व विकत घेणे विरुद्ध कायदा भा.द.वि. कलम 372
11. पत्नीस मारहाण करुन सामान्य वा गंभीर जखमी करणे विरुद्ध कायदा भा.द.वि. कलम 323 व 325
12. बलात्कार प्रतिबंधक कायदा भा.द.वि. कलम 376
13. द्विभार्य प्रतिबंधक कायदा भा.द.वि. कलम 495
14. वेश्याव्यवसाय प्रतिबंधक कायदा -1956
15. वडिलांच्या संपत्तीत मुलींचाहक्क कायदा -1956
16. समान वेतन कायदा - 1976
17. कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा 1998 व दुरुस्ती विधेयक 2001
18. कौटुंबिक हिंसाचार कायदा- 2005
19. स्त्रीयांचे अश्लिल प्रदर्शन विरोधी कायदा
20. स्त्री शिक्षणाचा हक्क

अशा प्रकारे ब्रिटीश काळात व स्वातंत्र्य प्राप्तीनंतर वेगवेगळया कलमान्वये भारतीय महिलांनासंरक्षण कवच निर्माण करुन दिलेतसेच महिला आयोगाची व महिला व बालकल्याण मंत्रालयाची स्थापना करुन महिलांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने मानवी अधिकाराचेसंरक्षण करण्याचा प्रयत्न कायद्याच्या चौकटीत केलेल्या असला तरीही केवळ मुठभर महिलांनाचत्यांचेहक्क व अधिकार मिळाले. देशातीलहजारो स्त्रिया आजही विविध कारणानेबळी जाताना दिसून येतात. एवढेच नव्हे तर 2011 च्या जनगणना अहवाला प्रमाणे 24 कोटी महिला निरक्षर आहेततर दरहजारी पुरुषामागे स्त्रीचे प्रमाणे 940 एवढे आहे.मुलींवर होणारे अन्याय, अत्याचार, असुरक्षीत जीवन पाहता पालकांनी मुलीचा जन्मच नाकारणारी मानसिकता निर्माण केली आहे.

भारतातील काहीस्त्रीयांना सन्मानाने जीवन जगण्याचीसंधी मिळाली असलीतरी आजही कोटयावधी महिलांचे मानवी हक्क पायदळी तुडविले जातात.देशातील 24 कोटी महिलांना आपल्या हक्काची जाणीव देखील नाहीहे सामाजिक वास्तव आहे.

निष्कर्ष :-

मानवी हक्कांचीसंकल्पना स्त्रीयांच्या जीवनाला दिशा देण्यासाठी मोलाचीअसली.पण दोषपूर्ण अंमलबजावणीमुळे भारतीय स्त्रिया आजही अन्याय, अत्याचाराच्या बळी पडतात.

स्त्रीयांचे मानवी हक्क समाजानेमान्य केल्यामुळे त्यांना विविध क्षेत्रात काम करण्याचीसंधी मिळालीहे जरी वास्तव असलेतरीतेप्रातिनिधीक स्वरुपात आहे. कारण आजही ग्रामीण व आदिवासी भागातील महिलांच्या जीवनातील अज्ञानाचा अंधकार दूरझालेला नाही.

मानवी हक्काच्या स्वरक्षणासाठी भारतीय राज्य घटनेत अनेकतरतुदी केल्या व विविध कायदे करण्यात आले असलेतरीअंमल बजावणीतील दोषामुळे भारतीय महिलांच्यासकल विकास होऊ शकला नाही.

शिफारशी :-

मानवी हक्काचे शिक्षण घरा-घरात पोहचविण्यासाठी अभ्यासक्रमातील मानवी हक्काच्या शिक्षणासाठी बरोबरच प्रसार माध्यमाच्याद्वारे जाहीरातबाजी करणे काळाची गरज आहे.

संविधान साक्षरता अभियान राबविण्यासाठी शासनाने विशेष मोहिमहाती घेवुन स्त्रियांमध्येमानवी हक्काबाबत जाणीव जागृती घडवावी.

समारोप :-

भारतीय महिलांच्या जडणघडणीत मानवी अधिकाराचे मोलाचे योगदान आहे.चार भिंतीच्या आत असलेलीस्त्री आज सर्वच क्षेत्रात हिरारीने भाग घेतांना दिसते.हे वास्तव असलेतरीहे प्रमाण प्रतिनिधीक स्वरुपात असुन आजही महिलांना अन्याय, अत्याचारालातोंड द्यावे लागते.समाजाचे परिवर्तन करण्यासाठी शासनाने विशेष प्रयत्न करणे काळाची गरज आहे.तरचसमाजाचे विकृत रुप बदलेल अन्यथ भविष्यकालीन भारतीय समाजाचे अस्तीत्व धोक्यात आहे. यात शंका नाही.


1. डॉ. नागोराव कुंभार, प्रा.सुधाकर कुलकर्णी, (2010), मानवी हक्क मानव अधिकार राष्ट्रीय कार्यशाळा महात्मा बसेश्वर महाविद्यालय, लातूर.
2. लिआ लेव्हिन - मानवी हक्क, अनुवाद - विकास देशपांडे (2002), मानवी हक्क प्रश्न आणि उत्तरे, नॅशनल बुक ट्रस्ट दिल्ली, प्रस्तावना.
3. विभुते भालबा, (2009) भारताचे संविधान, मनोविकास प्रकाशन, पुणे.
4. डॉ. शांताराम भोगले, (1997), भारतीय राज्यघटना विकास, स्वरुप आणि राजकारण, विद्याभारती प्रकाशन, लातूर.
5. देशपांडे एस.एस., (2014), मानवी हक्क, चेतना बुक्स, पुणे.
6. www.wikipedia.org